## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

### निविदा सूचना

क्रमांक रातुमनावि/स्थाअ /२०१०/१६१६ दिनांक ५ जुलै, २०१०

दिनांक १६ ऑगष्ट २०१० ते १५ ऑगष्ट २०११ या कालावधीकरीता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांना माजी सैनिक सेवेतील सूरक्षा गार्डस् एकत्रित वेतनावर पुरवठा करण्यासाठी खालील बाबींची पूर्तता करणाऱ्या, तसेच विद्यापीठाच्या विहीत अटी व शर्ती मान्य असलेल्या सुप्रस्थापित सिक्युरिटी एजन्सी कडून विहित नमुन्यातील प्रपत्रात निविदा मागविण्यात येत आहे.

०१. सिक्युरिटी एजन्सी ही केन्द्र किंवा राज्य शासनाद्वारे पंजीबद्ध असावी व त्यांचे लेबर लायसंन्स ३१ डिसेंबर, २०१० पर्यंत वैध असावे. (लेबर लायसंन्सची प्रत सोबत जोडावी)

०२. सिक्युरीटी एजन्सीची आर्थिक स्थिती सबळ असावी. निविदा सादर करतेवेळी तसेच त्यानंतरही एजन्सीच्या बँक खात्यात रु. ५ लक्ष पेक्षा जास्त रक्कम असावी. **( ३० जून, २०१० रोजीची संस्थेच्या खात्यातील शिल्लक बाबतचे प्रमाणित बँक लेखा विवरणची प्रत सोबत जोडावी)**

०३. सिक्युरिटी एजन्सीचे स्वतंत्र कार्यालय असावे आणि त्यामध्ये दूरध्वनी व संदेशवहनाच्या सोई उपलब्ध असाव्यात. तसेच सुरक्षा गार्डस्च्या स्थळ तपासणीसाठी एजन्सीच्या मालकीची जीपगाडी किंवा इतर वाहन असावे.

०४. भविष्य निर्वाह निधी, आयकर, सेवाकर, व्यवसाय कर, कर्मचारी विमा अंशदान आदि कर व इतर देय रकमेचा दिनांक ३० जून, २०१० पर्यंतचा भरणा केलेला असावा.

०५. निविदेत नमूद केलेले एकत्रित वेतन शासनाने निर्धारीत केलेल्या किमान वेतनापेक्षा कमी नसावे.

०६. शासनाने निर्धारित केलेल्या किमान वेतनापेक्षा कमी वेतन नमूद करणारी निविदा अमान्य करण्यात येईल.

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या सिक्युरीटी एजन्सिने **कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर** यांच्या नावे असलेला रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) चा धनाकर्ष स्थावर अधिकारी यांचे कार्यालयात सादर केल्यास विहित नमुन्यातील निविदा प्रपत्र प्राप्त होऊ शकेल. नमुना निविदा प्रपत्र वितरणाची अंतिम तारीख १७ जुलै, २०१० असून, सिलबंद निविदा त्याच ठिकाणी दिनांक १७ जुलै, २०१० रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. तसेच प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा दिनांक १९ जुलै, २०१० रोजी दुपारी १.०० वाजता मा. कुलसचिव कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर,नागपूर येथे सर्वांसमक्ष उघडण्यात येतील.

निविदा उघडण्याच्या वेळी संबंधित कंत्राटदार किंवा त्यांचे प्रतिनिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतील. सदर कंत्राटसंबंधीच्या करारनाम्याच्या अटी व शर्ती विहित नमुना निविदा प्रपत्रासह जोडण्यात आलेल्या आहेत. कोणत्याही कारणास्तव प्राप्त सर्व निविदा किंवा कोणतीही निविदा रद्दबादल ठरविण्याचे अधिकार विद्यापीठाला राहतील. तसेच विद्यापीठातर्फे नामित तपासणी समितीच्या अहवालानुसार कोणत्याही एजन्सीला वाटाघाटीकरिता बोलाविण्याचा अधिकार विद्यापीठाचा राहील.

( डॉ. अरविंद चौधरी )
कुलसचिव

प्रतिलिपी माहितीकरिता अग्रेषित :–

१. **मे. निकीता मिडीया सर्व्हिसेस, नागपूर**
यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त जाहिरात स्थानिय दैनिक वृत्तपत्र हितवाद, इं. लोकमत व दैनिक भास्कर मध्ये प्रकाशित करुन जाहिरातीसह देयक कार्यालयास प्रस्तुत करावे.

२. **डॉ. श्रीमती विना प्रकाशे, माहिती शास्त्रज्ञ,** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ.
यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त जाहिरात विद्यापीठ व शासकीय संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात यावी.

(विनोद इलमे)
स्थावर अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ

05/07/10

Securities 2010 - 11

Soft Poly closed on account of Bharat Bandh.